साप्ताहिक
आकाशतरंग

# जे.एम. पटेल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर्स म्हणून निवड

**भंडारा** - येथील जे.एम. पटेल महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.क्लब ऑफिसर म्हणून निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये वृषांक लांडगे (प्रेसिडेंट), जय धनरे (सेक्रेटरी),उत्कर्ष गणवीर (ऍक्टिव्हिटी डायरेक्टर), विजय लांजेवार (पी.आर. मेडिया डायरेक्टर) आदि विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सदर विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमान नगर (पुणे) येथील क्विक हिल कंपनीच्या ऑफिसमध्ये २ जुलै रोजी घेण्यात आले.या कार्यशाळे दरम्यान



विद्यार्थ्यांना अजय शिर्के सर, गायत्री पवार मॅडम यांनी या सायबर गुन्हे, त्यावरील उपाय व सायबर सुरक्षेची माहिती दिली. तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये मोहीम कशी राबवावी, याचे मार्गदर्शन केले. क्वीक हिलच्या चेअर पर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढिल वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. क्विक हिल फाउंडेशन आणि महाविद्यालया सोबत झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत निवड झालेले विद्यार्थी पुढील काही दिवसांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पासाठी सायबर सिक्युरिटी अवेअरनेस बद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत.सायबर सुरक्षेच्या उपक्रमाचे हे चवथे वर्ष असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर सुरक्षेबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती सादर करण्याची संधी मिळणार आहे.तसेच, विद्यार्थ्यांना सदर उपक्रमांतर्गत 'कमवा आणि शिका' या माध्यमातून आर्थिक मदतही होणार आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रदिप मेश्राम यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी मार्गदर्शन करून त्यांचे अभिनंदन केले.या करारासाठी विभागप्रमुख डॉ.प्रविण घोसेकर, तसेच संगणक विभागाचे प्राध्यापक डॉ.सबाह नसीम, प्रा. पलाश फेंद्वेवार, प्रा.सौ. प्रियंका शर्मा, प्रा. सौ. फरीना शेख यांनी मेहनत घेतली

05 Jul 2025
Powered By Akash News Network